# 'पाणी वापर, नियोजन महत्त्वाचे'

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'पाण्याबाबत महाराष्ट्र संपन्न राज्य आहे, हे वास्तव असूनही पाण्याचे योग्य नियोजन आणि त्याचा पुनर्वापर याकडे दुर्लक्ष झाल्याने पाणीप्रश्न गंभीर बनत आहे. पाण्याचा प्रश्न निकालात काढण्यासाठी तत्कालीन उपायांपेक्षा दीर्घकालीन धोरणे अधिक उपयुक्त ठरू शकतील,' असे मत इचलकरंजी येथील समाजवादी प्रबोधिनीचे सरचिटणीस प्रसाद कुलकर्णी यांनी व्यक्त केले. डॉ. जे. एफ. पाटील अमृतमहोत्सव सत्कार समिती व कमला कॉलेजचा अर्थशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने कमला कॉलेज येथे आयोजित व्याख्यानात ते 'प्रश्न पाण्याचा' या विषयावर बोलत होते. अध्यक्षस्थानी ताराराणी विद्यापीठाचे सचिव डॉ. क्रांतिकुमार पाटील होते.



प्रसाद कुलकर्णी

कुलकर्णी म्हणाले, 'आपल्या देशाला प्रचंड मोठा समुद्रकिनारा लाभला आहे. त्या पाण्याचे नि:क्षारीकरण करून पाण्याची उपलब्धता वाढविणे शक्य आहे. भूगर्भातील पाणी जपून वापरणे गरजेचे आहे. त्यासाठी पाण्याचे योग्य नियोजन व जलसाक्षरता हाच प्राणी प्रश्नावर उपाय आहे.'

डॉ. पी. बी. कुलकर्णी म्हणाले, 'सत्कार समितीच्यावतीने जो निधी संकलित केला जाणार आहे, त्यामधून कोल्हापूर, सांगली, सोलापूर, सातारा जिल्ह्यांमध्ये 'प्रश्न पाण्याचा' विषयावर तज्ज्ञांची व्याख्याने आयोजित केली जाणार आहेत. तसेच चार समाजोपयोगी पुस्तकांचे प्रकाशन केले जाणार आहे. त्याचे उत्पन्न व संकलित निधी इचलकरंजी येथील समाजवादी प्रबोधिनी संस्थेला दिला जाणार आहे.

कार्यक्रमास प्राचार्य डॉ. जे. बी. पाटील, डॉ. जे. एफ. पाटील, डॉ. एस. एम. भोसले आदी उपस्थित होते. डॉ. तेजस्विनी मुडेकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नेताजी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. सुभाष दगडे यांनी आभार मानले.

Scanned by CamScanner